भाईंदर, ता.व जि.ठाणे येथे रो-रो सेवेच्या अनुषंगाने जेट्टी सुविधा निर्माण करणे या कामाकरती रू.१४.१५ कोटी इतक्या रकमेचा अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः आयडब्ल्यूटी ०३१७/प्र.क्र.६३/बंदरे-२

गृह विभाग, मंत्रालय,

मुंबई- ४०० ०३२

दिनांक :- २६ ऑक्टोबर, २०१७

वाचा :- मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचे पत्र क्र. ममेबो/मुकाअ/ अभि-४/रो-रो सेवा अंदाजपत्रक/१०९, दिनांक ०६.०३.२०१७

प्रस्तावना:

महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. या किनारपट्टीत अनेक लहान मोठ्या खाड्या असून त्याचा जलवाहतूकीसाठी पूर्वापारपासून वापर करण्यात येत आहे. अंतर्गत जलमार्ग हा प्रवासी वाहतूकीच्या दृष्टीने सुखकर तसेच कमी वेळेचा पर्याय आहे. सध्या भाईंदर ते वसई या ठिकाणादरम्यान रो-रो फेरी सेवा सूरू आहे. तथापि, भाईंदर येथे जेट्टी सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाश्यांना बोटीमध्ये चढतांना व उतरतांना त्रास सहन करावा लागतो. सबब, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने भाईंदर येथे जेट्टी सुविधा उभारण्याचा प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

भाईंदर, ता.व जि.ठाणे येथे रो-रो सेवेच्या अनुषंगाने जेट्टी सुविधा निर्माण करणे या कामाकरीता रू.१४.१५ कोटी इतक्या रकमेस खालील अटींच्या अधीन प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रकल्पाकरीता पर्यावरण तसेच आवश्यक असणाऱ्या परवानग्या प्राप्त झाल्यानंतरच प्रकल्प हाती घेणे योग्य होईल.

२. सदरचे काम १२ महिन्यांत पूर्ण करण्यात यावे.

२. याबाबत होणार खर्च भागविण्याकरीता निर्माण करावयाच्या लेखाशिर्षाबबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमीत करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय केंद्र शासनाच्या सागरमाला कार्यक्रमास मान्यता देणेबाबत मा.मंत्रिमंडळाच्या दि.१९.०९.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आणि नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १७५/का.१४६१, दिनांक ११.०७.२०१७ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. क्र.३३७/२०१७/व्यय-८, दिनांक १८.१०.२०१७ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०३१११२०८५९८८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Hanmanlu Damayyawar

Digitally signed by Ashok Hanmanlu Damayyawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2bd0dc6138e4f3c9997616b47f0dc918cd4715f466afd0623c843397ffc06a09, serialNumber=2cc45c1c1345a8b6ff1e9fdbd2d12c6527f6d070c05b708bcc57b79b7ef3a95d, cn=Ashok Hanmanlu Damayyawar
Date: 2017.10.31 11:58:53 +05'30'

(अ. ह. दमय्यावार)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) वित्त विभाग (व्यय-८/अर्थसंकल्प-११), मंत्रालय, मुंबई-३२.
५) नियोजन विभाग (का. १४६१), मंत्रालय, मुंबई-३२.
६) प्रधान सचिव (बंदरे), मंत्रालय, मुंबई,
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई
८) निवडनस्ती (बंदरे-२).